# संगीत-शिक्षणाचे महत्त्व

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - विद्याविकास - अंक ३५, विकास प्रकाशन, डिसें. १९८५)

**भाषा व संगीत :**

सर्व संसार नादाच्या अधीन असतो; नादावर अवलंबून असतो. म्हणून नादाचे महत्त्व अपार ही भारतीय भूमिका प्राचीन काळापासून मांडली गेलेली आहे. शंकराच्या डमरूमधून संगीत आणि भाषा दोहोंचे मूलनाद निर्माण झाले. या कथेमुळे नादाच्या विविध भूमिका ठासून मांडल्या जातात. नादांना व्यवस्थित करण्याचे, त्यांचे एक नियमबद्ध व्याकरण बनविण्याचे कार्य संगीत व भाषा या दोहोंत पार पाडलेले दिसते. म्हणूनच नागरिकत्वाचा ओनामा गिरविताना या दोहोंकडे सुरुवातीपासून लक्ष द्यावे असे म्हणण्यात खास अर्थ आहे. सर्व जीवनव्यवहाराला आदर्श अशी मानसिक अवस्था तयार करावयाची तर भाषा व संगीत यांचे महत्त्व विसरून चालण्यासारखे नाही.

**संगीत-अध्ययन :**

इथे एक बाब ध्यानात घ्यायला हवी. संगीत शिकायचे याचा अर्थ प्रत्येकाने गवई व्हावे, वादक व्हावे वा कलावंत व्हावे असा मुळीच नाही. किंबहुना असा गैरसमज झाल्यामुळेच आपल्या शिक्षणपद्धतीत संगीताला योग्य ते स्थान मिळालेले नाही. हा विचार थोडा स्पष्ट करू.

**संगीत-अध्ययन आणि एकाग्रता :**

सर्व मानवी व्यवहारांत शारीरिक आणि मानसिक घटक कार्यकारी होत असतात. उदाहरणार्थ, एखादी गोष्ट जमिनीवरून उचलायची असेल तर वाकणे, बोटांनी कोन साधणे इत्यादी शारीरिक हालचाली व्हायला हव्यात. याचबरोबर जरूर त्या स्नायूंनी योग्य त्या प्रमाणात योग्य त्या हालचाली योग्य वेळी कराव्यात. यासाठी जे संदेश अवयवांना पोचते व्हावे लागतात, त्याकरिता जरूर तो मानसिक निर्णयही घ्यायला हवा. निराळ्या शब्दांत सांगावयाचे तर असे म्हणता येईल की, शारीरिक आणि मानसिक क्रियांचे संतुलन होण्यावरच सर्व व्यवहार नीटपणे सिद्ध होणे अवलंबून राहत असते. वस्तू जमिनीवरून उचलण्याची क्रिया जरी जास्तकरून शारीरिक असली तरी अधिक मानसिक म्हणता येतील अशा क्रियांमध्ये सुद्धा (उदा. पुस्तक वाचणे, विचार करणे) शरीर व मानस संतुलन लागते हे सहज ध्यानात येण्यासारखे आहे. या संतुलनाचे निराळे नाव 'एकाग्रता' हे आहे. एकाग्रता म्हणजे सर्व शक्तींना एक टोक आणणे. कोणतेही काम करत असता एकाग्रता साधल्यास गुणवत्ता, क्षमता इत्यादी सर्व बाबतींत वाढ होते असे आवर्जून विवेचन केलेले आढळते. एकलव्याला धनुर्विद्या स्वतःच्या बळावर साध्य झाली आणि स्वामी विवेकानंदांना भूमितिविद्येचे चार भाग एका रात्रीत समजले, याचे रहस्य एकाग्रतेत सापडते असा हवाला दिलेला आढळतो.

संगीताचे महत्त्व कलावंत होण्यासाठी नव्हे, तर ही एकाग्रतेची अवस्था सहजपणे साधावी यासाठी. एकाग्रतेसाठी ज्या काही निरनिराळ्या युक्त्या वापरल्या जातात (उदा. टक लावून बसणे, जप करणे) त्या सर्वांपेक्षा संगीताची क्षमता जास्त असते. संगीताचे संस्कार आणि वापर यांना शिक्षणात सर्व पातळ्यांवर स्थान द्यायला हवे ते यासाठीच होय.

**शब्दहीन संगीताद्वारे एकतानता :**

संगीताद्वारे साध्य होणारी एकतानता अधिक सुलभ का, यासंबंधी थोडा विचार करू. एक तर नादाला स्वतःचा असा कोशातला, पक्का असा अर्थ नसतो. (भाषेला तो असतो.) या कारणाने अर्थाद्वारे इतर, सूचित बाबींकडे 'अचपळ मन' धावत नाही. विशिष्ट, निश्चित भावना जागृत करावयाच्या तर शब्दांचा वापर करावा. पण केवळ एक व्यापक अशी ग्रहणक्षम मनोवस्था निर्माण व्हावी या दृष्टीने प्रयत्न करावयाचा असेल तर शब्दहीन संगीताचा उपयोग जास्त परिणामकारक ठरतो अशी ही भूमिका आहे. म्हणूनच वाद्ये आणि त्यांचा नाद मानसिक एकाग्रता साधण्यासाठी वापरण्याच्या दृष्टिकोणातून अभ्यासक्रम आखले गेले पाहिजेत.

**संगीत आणि सातत्य :**

याच संदर्भात लक्षात घेण्याची गोष्ट अशी की, संगीताच्या प्राचीन व्याख्येप्रमाणे गीत, वाद्य व नृत्य या तिहींचा संगीतात समावेश होत असतो. शब्द आणि सूर यांचा मिलाफ म्हणजे गीत ही सर्वसाधारणतः रूढ आणि मान्य असलेली व्याख्या होय. पण प्रस्तुत संस्कारसंबंधित प्रयोगाच्या दृष्टीने पाहता 'गीत म्हणजे अखंडपणे जात राहते, गतिमान असते ती स्वरधून' होय. 'नृत्य' म्हणजेही इथे कथ्थक, भरतनाट्यम् इत्यादी शास्त्रोक्त पदवीला पोचलेली नृत्ये असा अर्थ नसून, लयबद्ध अशा सहेतुक हालचालींचे बंध होत. संस्कारक संगीताच्या तिन्ही आविष्कारांतला समान गाभा कोणता असे विचारल्यास उत्तरादाखल पुढीलपैकी एकच शब्द देता येईल - सातत्य, अखंडपणा वा सलगता. कुठेही धक्का, खडबडीतपणा, धसमुसळेपणा यांचा आढळ होता कामा नये. वरवर पाहता साधी वाटणारी ही गोष्ट किती अवघड आहे याचा प्रत्यय अगदी साध्या साध्या प्रयत्नांतूनही येऊ शकतो.

**संगीतसंस्कारासाठी सहभागाची गरज :**

प्रयत्न या शब्दामधून एक अतिशय महत्त्वाचा मुद्दा पुढे येतो. संगीत ऐकणे हा अतिशय दुय्यम भाग आहे. संगीत हा क्रियायोग आहे. प्रत्यक्ष स्वतः करून पाहणे हा घटक सर्वात महत्त्वाचा होय. महत्त्वाचा इतकेच नव्हे तर अपरिहार्यपण. संगीताचा प्रयोग प्रत्येकाने स्वतःसाठी स्वतःच करून पाहावा लागतो. त्याशिवाय त्याचा संस्कार होऊ शकत नाही आणि संस्कारापासून मिळणारे फायदेही मिळू शकत नाहीत. आकाशवाणी, दूरचित्रवाणी, ध्वनिमुद्रिका इत्यादी संपर्कमाध्यमांचा उपयोग आपण स्वतः प्रत्यक्षतः करून पाहत असलेल्या संगीताच्या प्रयोगाची गुणवत्ता सुधारावी यासाठी करायचा असतो. त्याऐवजी सर्वांनी केवळ प्रेक्षक, श्रोते यांच्या भूमिकेत जाणे म्हणजे संगीताच्या संस्कारक सामर्थ्याविषयी आणि त्याच्या कार्यपद्धतीविषयी नेमकी समज नसणे होय. गाणे, वाजविणे वा नृत्य करणे यांचे आणि यांच्याद्वारे साधण्याच्या गोष्टींचे संस्कार हवे असतील तर स्वतः आखाड्यात उतरल्याशिवाय चालणार नाही. भारतातील सर्व भक्तीपरंपरांमध्ये संगीत अवतरते ते सर्वांनी भाग घेण्याच्या शर्तीवर, हे लक्षात घेण्यासारखे आहे. केवळ पाहणे वा ऐकणे या भूमिका शास्त्रोक्त संगीताचा वा कोणत्याही संगीताचा वापर करमणूक म्हणून करावयाचा असेल तर योग्य ठरतात.

पण संगीताचा संस्कार हवा असेल तर प्रत्यक्ष प्रयोगावर भर हवा. शिक्षणात संगीताचा समावेश करावयाचा तो याही दृष्टीने विचार करूनच.

**संस्कारक संगीत व सामूहिकता :**

संस्कारक संगीत सामूहिकही हवे. एकंदरीने पाहता व्यक्तीला समाजाशी वा सामाजिक घटकांशी मिळवून घेता येण्यावर संतुलनक्रिया यशस्वी होणे अवलंबून असते. संस्कारक संगीताची सामूहिकता म्हणजे समूहातल्या प्रत्येकाने 'एकमेकां साह्य' करून सुपंथ धरणे. सामूहिक आविष्कारात गाताना, वाद्यवादन करताना वा नृत्य करताना कोणीही मागे पुढे होणे वा कमी-जास्त उत्साहाने भाग घेणे या निषिद्ध गोष्टी होत. असे झाल्यास-कोणीही दोषी असल्यास–पूर्ण आविष्काराला तडा जातो. दोषी कोण आणि सांभाळून घेणारा, मिळते-जुळते घेणारा कोण हेसुद्धा आविष्कारात सहजपणे ध्यानात आल्याशिवाय राहत नाही. सामूहिकता याचाच अर्थ मन व शरीर एकच असल्यासारखे अनेकांनी वागणे. मात्र सामूहिकता म्हणजे जमाव नव्हे हे लक्षात ठेवले पाहिजे. समूह विशिष्ट कारणाने तयार होतो आणि विशिष्ट पद्धतीने कार्यही करतो. जमावाचे तसे नसते. संस्कारक संगीताला सामूहिकता जवळची असते ती या पार्श्वभूमीवर.

स्वतःवर नियंत्रण असणे ही सामाजिक व्यवहारातली सर्वांत महत्त्वाची बाब होय. योग वा अध्यात्म इत्यादींनी याच गोष्टी साधण्याचा प्रयत्न होत असतो. पण सार्वजनिक शिक्षणाने आपले प्रयत्न याहीपेक्षा व्यावहारिक पातळीवर जारी ठेवले पाहिजेत हे उघड आहे. नादाच्या प्राथमिक गुणधर्मावर लक्ष केंद्रित ठेवून शिक्षणाचा संस्कार करता येतो तो संगीताची चाकोरीबद्ध व्याख्या न केल्यामुळे! संगीत म्हणजे कला असे म्हणताच समाजातले बहुसंख्य लोक प्रेक्षक (श्रोते) बनणे अपरिहार्य असते. पण तसे करणे सामाजिक गरजेचे वा हिताचेही नाही. संगीताचे शिक्षण अनेक पातळ्यांवर शक्य असते. व्यापक पातळी समोर ठेवावयाची तर संस्कारक संगीत हा प्रकार निराळा असतो याची जाणीव बाळगणे जरुरीचे आहे.